माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक १०७७/२०१८

राधेशाम रामभाऊ सारस्कर,
मु.पो.पिंजर, ता.बार्शीटाकळी,
जि.अकोला

अर्जदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.मंडळ विभाग,
बार्शीटाकळी, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला

उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.मंडळ विभाग,
बार्शीटाकळी, ता.बार्शीटाकळी, जि.अकोला

| **उपस्थिती**: सुनावणी दिनांक **१२.०५.२०२२** | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| ज.मा.अ. | व्यक्तीशः | जीवन बमनोटे, सहायक अभियंता |
| प्र.अ.अ. | व्यक्तीशः | विनय बोळे, उपकार्यकारी अभियंता |
| तत्कालीन प्र.अ.अ. | व्यक्तीशः | संतोष राठोड, उपकार्यकारी अभियंता |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

अर्जदार गैरहजर

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा
दिनांकः १२ मे २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगाने चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | ०५.०१.२०१८ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | २५.०१.२०१८ |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १४.०२.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | - |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १२.०४.२०१८ / १६.०४.२०१८ |
| प्र.अ.अर्जापासून दिवसः | ६१ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | २९.०४.२०२२ |

२. अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

माहितीचा विषयः दि.२८.१२.२०१७ रोजी इंजीनीअर साहेब नवघरे हे आमच्या पिंजर येथील मालकीच्या जागेत सुरेश बंड, प्रमोद सरदार यांचे नावे अवैध नविन कनेक्शन देण्यासाठी आले होते आम्ही विरोध केल्यानंतर परत गेले. सदर नविन विज कनेक्शन ज्या कागदपत्राच्या आधारे (सुरेश बंड, प्रमोद सरदार) संबंधी नावे माझे राहते जागेत आमच्या संम्मती शिवाय मंजुर कसे करण्यात आले त्या प्रकरणासहित संबंधितांशी सर्व कागदपत्राचे प्रमाणीत झेरॉक्स देण्यात यावे, त्याकरीता येणारा खर्च देण्यास तयार आहे.

३. अर्जदार यांनी व्दितीय अपिल दाखल करण्याचे प्रयोजन पुढील प्रमाणे दिले आहेः

"६० दिवसात कोणतीही व्यवस्थित माहिती न मिळाल्यामुळे"

सुनावणी सूचना (नोटिस) वर लेखी निवेदन व सुनावणी

४. वर नमुद सूचनेद्वारे सर्व संबंधितांना व्दितीय अपिल अर्जाबाबत त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास संधी देवून सुनावणीचा दिवस कळविण्यात आला. तत्कालीन प्र.अ.अ. व ज.मा.अ. यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहेत.

५. तत्कालीन प्र.अ.अ. व ज.मा.अ. यांनी लेखी व समक्ष कळविले की, अर्जदाराला कार्यालयाचे पत्र दि.२५/०१/२०१८ अन्वये पंजिकृत डाकेने दि.३०.०१.२०१८ रोजी संपुर्ण माहिती देण्यात आली आहे.